# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 19 October 2024

## Time: 7.10 to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १९ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

*ठळक बातम्या*

- **बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयाकडून मार्गदर्शक तत्वं जारी**
- **कर्मयोगी सप्ताह–राष्ट्रीय शिक्षण सप्ताहाचं आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन**
- **मतदार याद्या अनियमितता प्रकरणी श्वेतपत्रिका काढण्याची महाविकास आघाडीची मागणी**
- **मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण यांचं राष्ट्रवादी काँग्रेसमधून निलंबन**

**आणि**

- **न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या क्रिकेट कसोटीत भारत १२५ धावांनी पिछाडीवर**

***सविस्तर बातम्या***

बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वोच्च न्यायालयानं मार्गदर्शक तत्वं जारी केली आहेत. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या पीठाने यासंदर्भातल्या एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान काल हे निर्देश दिले. या कायद्याच्या अंमलबजावणीत पर्सनल लॉ अर्थात वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणता येणार नाहीत, असं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट म्हटलं आहे.

****

कर्मयोगी सप्ताह–राष्ट्रीय शिक्षण सप्ताहाला आजपासून प्रारंभ होत आहे. नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज सकाळी साडे दहा वाजता या सप्ताहाचं उद्घाटन होणार आहे. या सप्ताहात प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याच्या कार्ययोग्यतेनुसार तज्ज्ञांच्या वेबिनारच्या माध्यमातून कामकाजाचं किमान चार तासांचं प्रशिक्षण दिलं जाणार आहे. कर्मचाऱ्याला आपल्या कामाचा तसंच सार्वजनिक सेवेचा दर्जा उंचावणं या प्रशिक्षणामुळे सुलभ होणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि मित्रपक्षांकडून मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. या आणि इतर विषयांमध्ये निवडणूक आयोगानं लक्ष घालावं, तसंच मतदार याद्यांमधल्या अनियमिततेबद्दल श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी या नेत्यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांच्याकडे केली आहे. या मागणीचं पत्र आघाडीने काल सादर केलं.

****

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारविरोधात आचारसंहिता भंगाची तक्रार केली आहे. आचारसंहिता लागल्यानंतरही सरकारने शासकीय संकेतस्थळावर एका दिवसात २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले. तसंच २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या. या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी, असं पत्र दानवे यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त तसंच राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडे सादर केलं आहे.

****

मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आलं आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी याबाबतचं पत्र काल जारी केलं. जाणीवपूर्वक पक्षविरोधी भूमिका घेत आणि पक्षशिस्त मोडल्याबद्दल ही कारवाई केल्याचं तटकरे यांनी या पत्रात म्हटलं आहे.

****

एमआयएमचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी नांदेड लोकसभा पोट निवडणूक लढवण्याचा मानस व्यक्त केला आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथे प्रसार माध्यमांशी बोलत होते. पक्ष श्रेष्ठींनी आदेश दिला तर नांदेड इथून निवडणूक लढवणार असल्याचं, सय्यद इम्तियाज यांनी सांगितलं.

****

मतदार यादीत नावनोंदणी करण्याचा आज अखेरचा दिवस आहे. नागरिकांनी आपलं नाव तपासून पहावं, आणि ज्यांचं मतदार यादीत नाव नाही, त्यांनी ते नोंदवावं, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी केलं आहे.

**ज्यांचं कुणाचं नाव मतदार यादीत दाखल करायचं राहिला असेल त्यांनी शनिवार दिनांक 19 ऑक्टोबर 2024 पर्यंत अर्ज सादर करावे जेणेकरून निवडणूक यंत्रणा त्याची छाननी करणे आणि त्याच्या पात्रतेविषयी निर्णय घेणे शक्य होईल आणि त्यानंतर पात्र अर्जदार मतदार यादीत आल्यानंतर त्यांना मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता येईल**

युवकांनी स्वतः मतदानाचे महत्त्व ओळखून इतरांनाही मतदानाचं महत्त्व सांगावं असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. ते काल देवगिरी महाविद्यालयात युवासंवाद कार्यक्रमात बोलत होते. यावेळी विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीसाठी पोवाडा आणि गीते सादर केली.

****

नांदेड इथं काल नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयात मतदान जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांनी युवकांशी संवाद साधला.

****

निवडणुकीदरम्यान विविध राजकीय पक्ष तसंच उमेदवारांकडून प्रचारादरम्यान वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचे दर निश्चित करण्याकरता लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षामार्फत तयार करण्यात आलेल्या दरपत्रकाविषयी यावेळी चर्चा करण्यात आली.

****

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात विविध ठिकाणच्या २५ हजार जाहिराती काढण्यात आल्या आहेत. आचारसंहिता कक्षातर्फे ही माहिती देण्यात आली.

****

बीड जिल्ह्यातील संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रावर पोलिसांचा विशेष बंदोबस्त असणार आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. गेवराई, माजलगाव, बीड, आष्टी, केज आणि परळी इथले एकूण ९६ मतदान केंद्र संवेदनशील असल्याचं पाठक यांनी सांगितलं. ते म्हणाले...

**संवेदनशील मतदान केंद्रं जे आहेत, ते निश्चित करण्यात येतील. आणि तिथे आवश्यक सूचना, ज्याच्यामध्ये छायाचित्रीकरण करण्यात येईल. आणि अतिरिक्त अर्धसैनिक बलाची नियुक्ती करण्यात येईल. क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या वेगवेगळ्या भेटी यांचं सुद्धा नियोजन करण्यात आलेलं आहे. आतापर्यंत पहिल्या टप्प्यामध्ये ज्यांचं परिगणन केलेलं आहे असे ९६ मतदान केंद्र आहेत, ज्याच्यामध्ये वाढ होऊ शकेल या मतदान केंद्रांवर इलेक्ट्रॉनिकली नियंत्रण ठेवण्यात येणार आहे.**

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धाराशिव जिल्ह्यात विविध ठिकाणी कारवाई करून १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला तर, ८८ गुन्हे दाखल केले. त्यापैकी ८० जणांना ताब्यात घेण्यात आलं आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात कंधार शहरात भेटवस्तू वाटपप्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या इसमाचा नागरिकांना भेटवस्तू वाटप करतांनाचं छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित झालं होतं. याबाबत भरारी पथकाद्वारे पाहणी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरून प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत**

****

ज्येष्ठ संस्कृततज्ज्ञ पंडित वसंतराव गाडगीळ यांचं काल पुण्यात निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. गाडगीळ यांनी शारदा ज्ञानपीठाची स्थापना केली, तसंच संस्कृत वाङ्मय आणि भारतीय संस्कृतीवर मोठं संशोधन आणि विपुल लेखन केलं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बंगळुरु इथं सुरू असलेल्या क्रिकेट कसोटीत भारत १२५ धावांनी पिछाडीवर आहे. काल न्यूझीलंड संघानं सर्वबाद ४०२ धावा केल्या. काल तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघाच्या दुसऱ्या डावात तीन बाद २३१ धावा झाल्या होत्या. यशस्वी जैस्वाल ३५, विराट कोहली ७० आणि रोहित शर्मा ५२ धावांवर बाद झाले, तर सरफराज खान ७० धावांवर खेळत आहे.

****

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीत भारताच्या पी व्ही सिंधूचं आव्हान संपुष्टात आलं. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात इंडोनेशियाच्या खेळाडूने सिंधूचा २१-१३, १६-२१, २१-९ असा पराभव केला.

****

परभणी इथं आजपासून ते २१ ऑक्टोबर दरम्यान १४ वर्षे वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांच्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. २७ ते २९ ऑक्टोबर दरम्यान १४,१७ आणि १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा होणार आहे. क्रीडाप्रेमी आणि खेळाडूंनी या स्पर्धेस उपस्थित राहून खेळाडूना प्रोत्साहन द्यावं असं आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी केलं आहे.

****

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोगी सेवाभावी संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ज्ञानतीर्थ-२०२४' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाला कालपासून प्रारंभ झाला. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अभिनेत्री प्राजक्ता हनमघर यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. या महोत्सवात विद्यापीठ परिक्षेत्रातल्या महाविद्यालयांचे दीड हजारावर विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथल्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयातील कनिष्ठ सहाय्यक मई बळीराम खांडेकर आणि अंगणवाडी सेविका सोनाली संदीप कदम या दोन महिला कर्मचाऱ्यांना काल दहा हजार रुपये लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं रंगेहात पकडलं. अंगणवाडी मदतनीस म्हणून नियुक्ती पत्रावर वरिष्ठांची स्वाक्षरी घेण्यासाठी त्यांनी लाच मागितली होती. त्यांच्याविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी प्रकल्पानं काल ६० व्या वर्षात पदार्पण केलं. १८ ऑक्टोबर १९६५ रोजी तत्कालिन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या हस्ते या प्रकल्पाचं भूमिपूजन झालं, तर १९७६ मध्ये तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्याचं लोकार्पण केलं. या निमित्तानं जायकवाडी पाटबंधारे विभागानं काल नाथसागर जलाशयाचं जलपूजन तसंच कोनशीलेला माल्यार्पण करण्यात आलं.

दरम्यान यंदा नाथसागर १०० टक्के भरल्यानं सध्या धरणाच्या १० दरवाजांमधून ५ हजार २४० दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे

****